## प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २७०वी बैठक

मुंबई, २२ मार्च, २०२२ – शासनाचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आज प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २७० वी बैठक पार पडली.

सदर बैठकीत मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या डि. एन. नगर ते मंडाळे या मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाच्या पॅकेज सी १०२ (एम.टी.एन.एल., बीकेसी ते डायमंड गार्डन , चेंबूर) उन्नत मेट्रो मार्गा साठीच्या रु.७५९.६८ कोटीच्या कामास कार्यकारी समिती कडून मंजुरी देण्यात आली.

तसेच मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज ४ करीता इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट सिस्टीम ( ITS ) टोल मॅनेजमेंट सिस्टम , इलेक्ट्रिकल कामे , हायवे आणि ब्रिज स्ट्रीटलाईटिंग सिस्टम टोल प्लाझाचे बांधकाम आणि कमांड कंट्रोल सेंटरसह प्रशासकीय इमारतींची रचना पुरवठा , स्थापना , चाचणी आणि कमिशनिंग इ. कामांकरीता रु.४२७.०० कोटी इतक्या रकमेस  कार्यकारी समितीने मंजुरी दिली.